E - 4008630

महाराष्ट्र शासन

# पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई

सयानी मार्ग, सिद्धिविनायक मंदिर जवळ, प्रभादेवी, मुंबई
संपर्क: ८१६९८८२८९८ ई- मेल pldeshpande१११@gmail.com

जा.क्र. : पुलदे/ १०१
दिनांक : २८/ १ /२०२५

प्रति,
संचालक
माहिती व तंत्रज्ञान,
मंत्रालय, मुंबई — ३२.

**विषय: पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या वापरासाठी असलेले वाहन क्र. एम.एच. ०१ ए.एन. १४४९ मारुती स्विफ्ट डिझायरच्या विक्रीबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या वापरासाठी असलेले मारुती स्विफ्ट डिझायर चार चाकी वाहन क्र. एम.एच. ०१ ए.एन. १४४९ विक्री करावयाची आहे. या विक्री संदर्भातील जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर दि. ३१ जानेवारी, २०२५ पूर्वी प्रसिद्ध करण्यात यावी, ही विनंती.

आपली विश्वासू,
M.G.Joglekar
(मीनल जोगळेकर)
संचालक

सोबत: नोटीस आणि वाहनाचा तपशिल.

E office O.W. NO 4003630
Successfully delivered on 29/1/25 at 3:57 p.m
29/1

महाराष्ट्र शासन

# पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई

सयानी मार्ग, सिद्धिविनायक मंदिर जवळ, प्रभादेवी, मुंबई

संपर्क: ८१६९८८२८९८ ई- मेल pldeshpande१११@gmail.com

जा.क्र. : पुलदे/ १००
दिनांक : २८/ १ /२०२५

**विषय: पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या कार्यालयीन वापरासाठी असलेले मारुती स्विफ्ट डिझायर हे वाहन विक्री करण्याबाबत.**

पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या कार्यालयीन वापरासाठी असलेले मारुती स्विफ्ट डिझायर ह्या चार चाकी वाहनाची विक्री करावयाची आहे. वाहनाची अधिक माहिती जाहिरातीमध्ये नमूद करण्यात आली आहे. इच्छूक खरेदीदारांनी वाहनाची योग्य माहिती घेऊन, दरपत्रक तयार करावे. त्याचसोबत जाहिरातीमध्ये नमूद आवश्यक कागदपत्रे जोडून सीलबंद लिफाफ्यात कार्यालयाच्या वर नमूद पत्त्यावर दि ०३.०२.२०२५ ते दि. १३.०२.२०२५ रोजीपर्यंत कार्यालयीन वेळेत सकाळी ९:४५ ते सायंकाळी १८:१५ वाजेपर्यंत पाठवावीत. नमूद शेवटच्या दिनांकानंतर येणाऱ्या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही.

वाहनाच्या अधिक माहितीसाठी **Maharashtra.gov.in** या संकेतस्थळाला भेट द्यावी.

या प्रक्रियेसंदर्भातील अंतिम निर्णय पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीचा राहील.

MBJoglekar

(मीनल जोगळेकर)
संचालक

१) परिचय: पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी मुंबई ही राज्यातील एकमेव अकादमी आणि राज्यातील सर्वोच्च सांस्कृतिक केंद्र आहे. या अकादमीमार्फत कला व सांस्कृतिक क्षेत्राच्या विकासासाठी अनेक कार्यक्रम, उपक्रम राबविले जातात. अशा विविध उपक्रम, कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी तसेच राज्यातील कला क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्या तरुणांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण देण्यासाठी कला अकादमीची स्थापना करण्यात आली आहे.

या अकादमीच्या नावे असलेले खालील मॉडेलचे वाहन विक्री करावयाचे असून त्यासाठी इच्छूक खरेदीदारांकडून दरपत्रके मागविण्यासाठी सदरची जाहिरात देण्यात येत आहे.

२) वाहनाचा तपशिल खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | वाहनाचा तपशिल |
|---|---|
| १ | Vehicle No. MH 01 AN 1449 |
| २ | Model: Maruti Swift Dzire, LXI BS IV |
| ३ | Engine No: K12MN1063076 |
| ४ | Chassis No: MA3ESKDI500291369 |
| ५ | Class: LMV |
| ६ | MFG CD: MARUTI SUZUKI INDIA LTD |
| ७ | Product Year: Sept. 2010 |
| ८ | आतापर्यंत चालविलेले वाहनाचे अंतर: १,६६,०५० किमी. |

३) महत्वाच्या सूचना:

कृपया वाहन खरेदी करण्यापूर्वी, दरपत्रक सादर करावयाच्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.

१. वाहनाची सर्वाधिक किंमत देणाऱ्या खरेदीदारकांची निवड करण्यात येईल.

२. उपरोक्त वाहन "आहे त्या स्थितीत" विक्री करण्यात येणार आहे.

३. वाहन पाहणी दरम्यान चालू स्थितीत आढळल्यास व दरपत्रकाची कार्यालयीन कार्यवाही करून वाहन ताब्यात देईपर्यंत, वाहन बंद पडल्यास वाहन कार्यालयाकडून चालू करून किंवा त्याचे आवश्यक ते कामकाज करून ताब्यात दिली जणार नाहीत, याची खेदीदारकांनी नोंद घ्यावी.

४. दरपत्रक सादर करणेकरीता कार्यालयाद्वारे नमुना तयार करण्यात आला असून, तो जाहिरातीच्या शेवटी प्रसिद्ध करण्यात आला आहे. सदरच्या नमुन्यातच आपले दर नमूद करून दरपत्रक सादर करण्यात यावे.

५. दरपत्रक सादर करताना इसारा (EMD) रक्कम रु.२,०००/- चा डिमांड ड्राफ्ट सोबत जोडावा. डिमांड ड्राफ्ट "P.L.Deshpande Maharashtra Kala Academy" या नावाने करावा.

६. निवड न झालेल्या दरपत्रकधारकास इसारा (EMD) रक्कम परत करण्यात येईल.

७. निवड झालेल्या दरपत्रकधारकाची इसारा (EMD) रक्कम बोली रकमेत समायोजित करण्यात येईल. निवड झालेल्या दरपत्रकधारकाने वाहन घेण्यास असमर्थता दर्शविल्यास त्याची इसारा (EMD) रक्कम त्यास परत केली जाणार नाही. ती रक्कम जप्त करण्यात येईल.

८. दरपत्रकामध्ये कोठेही खाडाखोड/ ओव्हररायटिंग/ पांढरी शाही लावणे टाळावे, तसे केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.

९. वाहनाची पाहणी/ तपासणी करणेकरीता तसेच वाहनाची अधिक माहिती मिळविणेकरीता कार्यालयाच्या खालील नमूद पत्त्यावर कर्यालयीन वेळेत सकाळी ९:४५ ते सायं. ६:१५ वाजेपर्यंत संपर्क साधावा.

१०. अंतिम दिनांकानंतर प्राप्त दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

११. खरेदीदाराने दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात खालील नमूद पत्त्यावर कार्यालयीन वेळेत सादर करावित. पोस्टाने, कुरीयरद्वारे दरपत्रक पाठविण्यात येत असल्यास नमूद दिनांकापूर्वी कर्यालयास प्राप्त होईल याची दक्षता घ्यावी. मुदतीनंतर प्राप्त झालेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत. तसेच ई-मेल अथवा व्हॉट्सअॅपद्वारे दरपत्रके पाठवू नयेत.

१२. खरेदीदारकास निवड करण्यात आल्याबाबत कळविण्यात आल्यानंतर दरपत्रकात नमूद रक्कम भरून एका आठवड्यात वाहनाचा प्रत्यक्ष ताबा घेणे अत्यावश्यक राहील अन्यथा दरपत्रक रद्दबातल ठरविण्यात येईल.

१३. दरपत्रकात सादर केलेल्या बोली रकमेवर आवश्यक तो वस्तु व सेवा कर भरणा करावा लागणार आहे.

१४. वाहनाची हस्तांतर नोंदणी व आवश्यक रोड टॅक्स रक्कमेबाबत सर्व प्रक्रिया निवड प्रक्रिया करण्यात आलेल्या खरेदीदरकास स्वखर्चाने करावी लागेल. तसेच आवश्यक तेवढा टॅक्स स्वखर्चाने भरावा लागेल. वाहतूक नियम भंगाबाबत वाहनावर ई-चलान द्वारे दंड असल्यास त्याचा भरणा या विभागामार्फत करण्यात येईल.

१५. निवड केलेल्या खरेदीदारकास वाहन खरेदीच्या अटी व शर्तीसह दरपत्रक मंजूरीचे पत्र ई-मेल किंवा पत्राद्वारे कळविण्यात येईल.

४) दरपत्रकधारकांनी सादर करावयाची कागदपत्रे:

१. खरेदीदाराचे दोन पासपोर्ट फोटो.

२. ओळखीचा पुरावा (पॅनकार्ड/आधारकार्ड/पासपोर्ट/मतदार ओळखपत्र इ. यापैकी कोणतेही एक.)

३. कंपनी/ फर्मच्या नावे वाहन खरेदी करावयाचे असल्यास त्याचे वस्तु व सेवाकर अंतर्गत नोंदणी असल्याबाबतचे प्रमाणपत्र.

४. इसारा (EMD) रक्कम रु. २,०००/- चा डिमांड ड्राफ्ट.

५) दरपत्रक पाठविणेकरीता व उघडणकरीता हजर रहावयाचा पत्ता व दूरध्वनी क्रमांक:

संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी

तळ मजला, सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई – ४०० ०२५.

दूरध्वनी क्रमांक: ०२२ २४३१ २९५६, २४३६ ५९९०.

६) महत्वाच्या दिनांक व वेळ:

१. दरपत्रके सादर करण्याची पहिली दिनांक: ०३.०२.२०२५

२. दरपत्रके सादर करण्याची शेवटची दिनांक: १३.०२.२०२५

३. दरपत्रके उघडण्याकरीता दिनांक: १४.०२.२०२५

सदर निवड प्रक्रिया जाहिरात कोणत्याही वेळी/ कोणत्याही कारणास्तव/ कोणत्याही टप्प्यावर/ पूर्णत: किंवा अंशत: रद्द करण्याचा/ फेरबदल करण्याचा अधिकार या विभागाकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.

**दरपत्रक सादर करणेकरीता कार्यालयाद्वारे नमूना**

प्रति,
संचालक,
पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी,
सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई- २५

**विषय: पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीचे मारुती सुझुकी डिझायर वाहन विक्री करणेबाबत.**

| अ.क्र. | तपशील | माहिती |
|---|---|---|
| १. | खरेदीदारकाचे नाव/ कंपनी/ फर्म असल्यास त्याचे नाव | |
| २. | खरेदीदारकाचा पूर्ण पत्ता | |
| ३. | खरेदीदारक कंपनी असेल तर कंपनीचा पूर्ण पत्ता | |
| ४. | जाहिरातीनुसार वाहन पाहणी केल्याचा दिनांक | |
| ५. | इसारा (EMD) रक्कम भरल्याचा क्रमांक व दिनांक | |

शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध कलेली जाहिरात....................................... अन्वये सदरचे दरपत्रक सादर करीत आहे. जाहिरातीमध्ये नमुद अटी व शर्तीनुसार खालील नमूद केलेले वाहन त्यासमोर नमूद केलेल्या किंमतीस जसे आहे, त्या स्थितीत खरेदी करू इच्छितो. सदरचे वाहन खरेदी नंतर हस्तांतरण नोंदणीकरीता होणारा सर्व खर्च मी/ आम्ही स्वखर्चाने करणार आहे/ आहोत.

वाहन क्र...............................................

बोली रक्कम: ........................................

उपरोक्त वाहनाच्या बोली रकमेवर आपल्या कार्यालयाकडून आकारण्यात येणारा आवश्यक तो वस्तु व सेवा कर भरण्यास माझी संमती आहे.

जाहिरातीमधील नमूद सर्व सूचना, अटी व शर्ती मला/ आम्हाला मान्य आहेत.

आपला,

दरपत्रकधारकाचे पूर्ण नाव व सही
संपर्क पत्ता व दूरध्वनी क्रमांक.